म.न.पा. ठराव क्रमांक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30–3 नुसार गठीत स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती ची सभा सोमवार दिनांक 29.5.2017 रोजी दुपारी 3–00 वाजता सिव्हील कार्यालयातील स्थायी समिती सभा कक्षात सपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त

सभेत मा. सभापती श्री संजय अनंत बंगाले, मा. उपसभापती श्री अभय प्रल्हाद गोटेकर मा. सदस्य श्री शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम, सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे मा. सदस्य श्रीमती ज्योती भिसीकर, मा. अतिरिक्त उप निगम आयुक्त श्री देवतळे अधिक्षक बाजार विभाग श्री उमरेडकर इत्यादी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली तथा मागील सभेत चर्चील्या प्रमाणे बाजार विभागा संबंधात विस्तृत माहिती अधिक्षक यांना देण्यास सांगीतली त्या अनुसार बाजार विभागात महानगरपालिकेचे झोन निहाय किती दुकाने, ओटे,खुली जागा आहे या बाबत विचारणा केली विभागाव्दारे यावेळी विस्तृत माहिती सांगण्यात आली त्यानुसार एकूण 2490 दुकाने 854 ओटे 1419 खुली जागा असे एकूण 4734 मालमत्ता बाजार विभागाची असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी विभागात किती कर्मचारी संख्या आहे या बाबतही माहिती विचारल्यावरुन देण्यात आली. बाजार विभागाचे उत्पनाचे उद्दीष्ठ तथा वसुलीबाबत यावेळी सांगण्यात आले. दुकाने ओटे खुली जागा किरायदार परस्पर स्थानांतरीत करुन अधिक लाभ घेत असल्याबद्दल तथा यात महानगरपालिकेला कोणतेही उत्पन्न होत नसल्याबद्दल चर्चा करण्यात आली यावर प्रत्येक स्थानांतरात एक विशेष निधी घेवून स्थानांतर करुन दिल्यास महानगरपालिकेला उत्पन्न होण्याची सुचना सभेत देण्यात आली यावर योग्य प्रस्ताव देण्याबाबत सभापती यांनी निर्देशित केले तथा या विषयावर मा महापौर , पक्षनेता , आयुक्त यांचेसह चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे सभापती यांनी सांगीतले.

बाजार क्षेत्रात स्वच्छते करीता स्वच्छतागृहे निर्माना करीता कोणत्या योजना आहे या बद्दल सभापती व्दारे विचारणा करण्यात आल्यावरुन विभागाव्दारे सांगण्यात आले की या करीता दरवर्षी झोन स्तरावर ,बाजार विभागात प्रावधान ठेवण्यात येत असल्याची माहिती दिली त्यावर सभापती यांनी याबाबत बाजार विभागाने प्रत्येक झोनला स्वच्छतागृहे बांधण्याच्या प्रगतीची माहिती घेण्यास सांगीतले तथा या करीता प्रत्येक झोनला पत्र लिहिण्याचे निर्देशित केले. कोणत्या बाजारात स्वच्छतागृहाची आवश्यकता आहे हे विभागाने झोनला सुचवावे असेही निर्देशित केले.

तसेच उदयनगरचौक ,रिंग रोड, आठवडीबाजार ज्या ठिकाणी लागते त्या क्षेत्रात मोठे बाजार बांधण्याचा प्रस्ताव विचारात असावा रस्त्यावर भरणा–या आठवडी बाजारामुळे वाहतुकीची मोठी कोंडी होते नागरिकांना याचा मोठा त्रास होतो यावर प्रतिबंधात्मक उपायाचा अवलंब करण्यात यावा बाजारावर महानगरपालिकेचे नियंत्रण असावे असे मा.

सभापती यांनी सुचविले. आशीर्वादनगर, रिंगरोड बाजार, सितावर्डी, नेताजीमार्केट गोकुलपेठ इत्यादी ठिकाणी बाजार विभागाची अव्यवस्था आहे असे निदर्शनात आणुन देण्यात आले.

बाजाराची स्थिती जाणून घेण्यास्तव जुन महिन्यात प्रशासन तथा समिती सर्व सभासदासह दौरा करण्यात येईल असे निर्देशित केले.

प्रत्येक बाजारात राहणाऱ्या दुकानदारांचा गोषवार हा महानगरपालिकेकडे असावा त्याचा फायदा नियोजन करण्यात नियम तयार करण्यात होईल असे सभापती यांनी सुचविले. बाजार शुल्क वाढविण्या करीता विभागाव्दारे प्रस्ताव देण्यात यावा बाजार विभागाची आय कोणत्या माध्यमातुन वाढविता येईल या करीता अभ्यास करुन योग्य प्रस्ताव विभागाने द्यावा असे निर्देशित केले.

यानंतर सभेच्या समाप्तीची घोषणा करण्यात आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती

**स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची शुक्रवार दिनांक 07.07.2017 रोजी दुपारी 12.30 वाजता सिव्हिल कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.संजय बंगाले, मा.उपसभापती श्री.अभय गोटेकर, श्री.शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम, मा.सदस्या श्रीमती सुषमा चौधरी, श्रीमती रश्मि धुर्वे तसेच विभागाकडून अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, सहा आयुक्त(बाजार विभाग) आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला विषयपत्रिकेवरील विषय क्र 1 पेंच प्रोजेक्ट प्रकल्पाचा आढावा घेण्यास सुरूवात करण्यात आली.

अधिक्षक अभियंता यांनी माहिती देतांना सांगितले, नेताजी मार्केट, गोकुलपेठ मार्केट, पाचपावली मार्केट, बर्डी जलप्रदाय कार्यालय, दानागंज आणि जरीपटका या सहा ठिकाणी शॉपिंग मॉल्स्च्या बांधकामाकरिता मे. युनिटी इन्फ्रा प्रोजेक्टस्ला 2008–09 मध्ये कार्यदेश देण्यात आले होते याकरिता करारनामा करण्यात आला होता. दानागंज आणि जरीपटका या ठिकाणी त्यांनी काम सुरू केले नंतरच्या काळात त्यांनी बंद केले त्यामुळे ते काम महापालिकेने आपल्या ताब्यात घेवून दुस–या एजन्सीला काम दिले. दुस–या एजन्सीकडून जरीपटका चे काम सुरु झालेले आहे मात्र दाणागंजचे काम अजूनही सुरू झालेले नाही. दाणागंज मार्केटच्या संदर्भात जागेचा इश्यू निर्माण झाला होता. जी जागा देण्यात आली ती मेझरमेंटमध्ये कमी बसली त्यामुळे आता मागच्या बाजूला स्लमची जागा घेवून जी जागा हस्तांतरीत करण्यात येणार आहे त्याचा प्लॉन नव्याने सबमीट सुध्दा करण्यात येईल इतर चार ठिकाणी म्हणजे नेताजी मार्केट, गोकुलपेठ मार्केट, पाचपावली आणि बर्डी जलप्रदाय कार्यालय या ठिकाणी जागा एजन्सीला हस्तांतरीत होवू शकली नाही. बर्डी जलप्रदाय कार्यालयाची जागा मेट्रोला देण्यात आल्यामुळे आता तीन ठिकाणी मार्केट करण्यासाठी जागेचे हस्तांतरण झालेले नाही त्यामुळे त्या ठिकाणी काम सुरू होवू शकले नाही.

मा.उपसभापती श्री.अभय गोटेकर यांनी प्रश्न उपस्थित केला की लीजवर दिलेली जागा दुस–याला रिनिव्ह करता येते काय? जर करता येते तर स्टॅम्प डयुटी रिनिव्हल फी महानगरपालिकेला मिळायला पाहिजे. शॉपिंग मॉलचे हस्तांतरीत करतांना ही बाब लक्षात घ्यावी अशी त्यांनी सुचना केली.

मा.सदस्य श्री.शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम यांनी विचारणा केली की लीजवर पट्टे, दुकाने, ओटे दिले असतांना कुठे ना कुठे त्याबाबतचे आदेश दिले असतात. कोणतीही योजना राबवित असतांना त्यामध्ये अटीशर्ती दिलेल्या असतात. त्याप्रमाणे मार्केटमध्ये लीजधारकांना ओटे दिले आहेत. ती जागा त्यांच्याकडून रिकामी करीत असतांना त्यांचेकरिता

काय प्रावधान ठेवण्यात आले आहे, त्यांचे स्थलांतर कुठे करणार याबाबत विभागाचे कोणतेही धोरण नसल्याचे दिसून येते तसेच पाचपावली मार्केटची जागा रिकामी करीत असतांना कमाल टॉकीज मार्केटच्या जागेत तेथील दुकानदारांना स्थलांतरीत करू शकत होतो परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही बाजार विभागाकडून करण्यात आली नाही. तसेच ज्या वापरासाठी जागा दिली असेल त्या पध्दतीचा त्याचा वापर न होता दुस–या वापरासाठी जागा वापरली जाते या बाबत सुध्दा बाजार विभागाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही असेही त्यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी सभेत संबंधितांना विचारणा केली की सिताबर्डी वगळता इतर तीन जागेवर जुनी दुकाने काढण्याकरिता बाजार विभागाने नोटीसची कार्यवाही केली काय? व त्याची सध्या परिस्थिती काय आहे. तसेच प्रस्तावित चार जागेंचा ताबा कंत्राटदारास न देण्यामागील कारणे काय? पाचपावली मार्केटचे 2006 पासून काम दिले असतांना गेल्या दहा वर्षात कुठल्याही मार्केटचे काम झालेले नाही. याबाबत बाजार विभाग आणि प्रकल्प विभागाच्या काही बैठका झाल्यात काय? मागच्या दहा वर्षात कोणत्या प्रकारचा पाठपुरावा करण्यात आला, दुकानदारांना नोटीस दिल्यात काय? काही धोरण ठरविण्यात आले होते काय? एजन्सीशी पत्रव्यवहार करण्यात आला काय? याबाबत माहिती विचारली.

प्रकल्प अधिकारी यांनी माहिती दिली, कंत्राटदाराला मार्केट संदर्भातील जागा हस्तांतरीत करण्यात आली नाही. जागेच्या संदर्भात तत्कालीन उपायुक्त यांच्याकडे 2012 मध्ये लीजधारकांची हिअरींग झाल्यानंतर कोणत्याही स्टेट्स पास झालेला नाही. त्यांची अपील पेंडींग आहे त्याबद्दल निर्णय झालेला नाही. सहा महिन्यात जागा हस्तांतरीत करून द्यावयाची होती ती जागा हस्तांतरीत करता आली नाही. दाणागंज आणि जरीपटका येथे काम अर्धवट सुरू केल्यामुळे एजन्सीचे 9 कोटी जप्त केले आणि 10 कोटी जमा आहेत तसेच वन टाईम प्रिमीयम 19 कोटी रूपये सुध्दा आपल्याकडे जमा आहेत. लिज रिनिव्हलच्या संदर्भात 800 लोकांना नोटीसेस पाठविल्या आहेत. ज्या लोकांकडे लीज बकाया आहे त्यांना सुध्दा नोटीस पाठविण्यात आल्या आहेत. हा प्रोजेक्ट रद्द करावयाचा की कंटीन्यू ठेवायचा याबाबत स्थायी समितीसमोर संबीमीशन करणार नाही तोपर्यंत काहीही होणार नाही.

तद्नंतर सहा. आयुक्त श्री.मेश्राम यांनी सांगितले कि, कंत्राटदाराला जागा हस्तांतरीत करण्याकरिता प्रकल्प विभागाला धोरण ठरवून द्यावयाचे होते. दुकानदारांना पर्यायी व्यवस्था करून द्यावयाची होती. महानगरपालिकेकडून जागा लिज वर देतांना एग्रीमेंट मध्ये असते की 11 महिन्यानंतर लिज रिनिव्हल केले पाहिजे आणि महानगरपालिकेला आवश्यकता पडल्यास जागा रिकामी करून देण्यात यावी. परंतु तशाप्रकारची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. जागा रिकामी करावयाची असेल तर त्याबाबत धोरण ठरवावयास पाहिजे होते तसे धोरण ठरविण्यात आले नाही. 2014 नंतर प्रोजेक्ट विभागाची कोणतीही बैठक झालेली नाही.

मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, चर्चेच्या अनुषंगाने असे लक्षात येते की या प्रकल्पाच्या संदर्भात प्रकल्प विभाग आणि बाजार विभाग यांच्यात समन्वय नसल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. या संदर्भात प्रकल्प विभाग आणि बाजार विभाग यांनी ताबडतोब आयुक्तांसमवेत बैठक लावून हा प्रकल्प बंद करावा. हे करीत असतांना महानगरपालिकेचे नुकसान होत असेल तर या दोन्ही विभागाने त्या त्या वेळेला काय करणे अपेक्षित होते हेही ठरविता येईल आणि त्या वेळेचे बाजार आणि प्रकल्प विभागाचे जे कुणी अधिकारी असतील ते जबाबदार राहतील. शॉपिंग मॉलच्या संदर्भात दोन प्रकल्प रिटेंडरींग गेले आहेत त्यात संबंधित विभागाने चांगल्या प्रकारे समन्वय साधून काम करावे असे मा.सभापती यांनी संबंधितांना सुचित केले.

2) हॉट मिक्स प्लाट मार्फत नागपूर शहरातील विविध भागात टाकण्यात येणा–या केबलच्या संदर्भात मा.सभापती यांनी विचारणा केली की स्मार्ट सिटी अंतर्गत शहरात केबल टाकण्याचे नियोजन झाले त्याकरिता हॉटमिक्स प्लांट विभागाद्वारे केबल टाकण्याच्या संदर्भात केबल कंपनीकडून सादर करण्यात आलेल्या किती प्रस्तावांना परवानगी देण्यात आली. कोणत्या भागात किती खोदकाम करण्यात आले, त्याचे रिस्टोरेशन किती दिवसात झाले, रिस्टोरेशनच्या अटी व शर्ती काय? कंपनीकडून जागोजागी खोदून ठेवण्यात आले. अनेक नगरसेवक आणि नागरिकांच्या तकारी आहेत याबाबत विभागाकडून सांगण्यात यावे.

कार्यकारी अभियंता यांनी सांगितले, स्मार्ट सिटी अंतर्गत शहरात डक केबल टाकण्याच्या कामाअंतर्गतएलएनटी कंपनी आणि इतर कंपनींना सुध्दा परवानगी देण्यात आली. या प्रकल्पात रिस्टोरेशनच्या संदर्भातील अटीमध्ये बॅंक गॅरंटी माफ करण्यात आलेली आहे. एकुण 842 कि.मी. ची परवानगी देण्यात आली होती त्यातील 667 खोदकामासाठी परवानगी दिली होती त्यातील काही काम बाकी आहे. एडीटीला 567 कि.मी.ची परवानगी दिली आहे.

तद्नंतर मा. उपसभापती श्री.अभय गोटेकर यांनी सांगितले कि, दक्षिण नागपूरातील दुर्गा नगर नेहरू स्टेडियम च्या जवळ डक रस्त्याच्या वर आलेले आहेत. आजूबाजूचे फिलींग न केल्यामुळे लोक त्या ठिकाणी पडत आहे. तसेच रस्त्यावर चेंबर वर येत आहे. ते चेंबर खाली जावू शकत नाही त्यासंदर्भात सुध्दा काय उपाययोजना करणार आहे. कंपनीच्या कामासंदर्भात जे बॅरिकेट लागलेले आहे त्यावर एलएनटी कंपनीने नाव लिहिले गेले नाही. जेव्हा की अटीशर्तीप्रमाणे काम करतांना त्या कंपनीचे नाव, कामाचे स्वरूप आणि दुरध्वनीकमांक लिहिले असले पाहिजे परंतु त्या पध्दतीचे बोर्ड लागलेले नाही. शारदा चौक जवाहरनगर गली नंबर 6 येथे केबल टाकण्याचे काम आहे. तेथील बोर्डावर अभय गोटेकरचे नाव टाकलेले आहे. गेल्या तीन महिन्यापासून ज्या ठिकाणी काम झाले त्या ठिकाणचे रिस्टोरेशनचे काम सुध्दा करून दिलेले नाही. काही ठिकाणी रस्त्याच्या कर्व वरती जे जंक्शन बॉक्स लागलेले आहे ते बरोबर लागलेले नाही. अशा जागांचा शोध घेवून ते जंक्शन बॉक्स शिफ्ट करण्यात यावे.

एलएनटीच्या प्रतिनिधीने सभेत माहिती देतांना सांगितले कि, 81 कि.मी.चे ओपन डक आहेत. 59 ठिकाणी फील अप केलेले आहे. त्या ठिकाणी रिस्टोरेशन केले आहे त्याठिकाणचे लोकेशन परत काढावे लागतात म्हणून टेम्परी स्वरूपाचे केले आहे. काम पुर्ण झाल्यानंतर प्रापरली त्याचे रिस्टोरेशन करण्यात येईल. स्मार्ट सिटी अंतर्गत 4 जी अंतर्गत 20 कि.मी.चे रूट असून 69 भागांचे काम दहा झोन कार्यालय ते मुख्य कार्यालय यांच्यात कनेक्टीव्हीचे काम 100 टक्के झालेले आहे. यावर मा.उप सभापती यांनी झालेली कामे आणि रिस्टोरेशनच्या कामांची पाहणी करण्यात यावी असे मा.सभापती यांना सुचविले.

सरतेशेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, केबल टाकण्याचे ज्या ज्या ठिकाणी काम सुरू आहे त्या त्या ठिकाणी संबंधित कंपनीची माहिती देणारे बोर्ड लावण्यात यावे. केबल टाकण्याच्या कामात परवानगी देतांना रिस्टोशनच्या कामाच्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी अटीशर्ती ठरवून घेतल्या पाहिजे. अटीशर्ती प्रमाणे काम होते आहे किंवा नाही हे चेक करण्यात यावे. खोदकामाचे शेडयुल्ड ठरवून घेण्यात यावे. काम करतांना जबाबदारीने वागले पाहिजे. काम करतांना एखादी पावसाळी नाली डॅमेज झाली असेल तर त्या संबंधित झोनल अधिका–याने चेक करून घेतले पाहिजे. आरोग्य विभागाला पत्र देवून पुढच्या खोदकामाच्या आधी समन्वय साधून दुरूस्त करून घेतले पाहिजे. झोनल अधिकारी, डेप्युटी इंजिनिअर, शाखा अभियंता, जे.ई. यांच्यात समन्वय साधून काम केले पाहिजे. त्याशिवाय काम करण्यात येवू नये. असे मा.सभापती यांनी निर्देशित केले. चर्चेत संबंधित कंपनीकडून माहिती दिल्याप्रमाणे त्यांच्या कामाची आणि रिस्टोरेशन कशा पध्दतीने त्यांनी केले आहे याची पाहणी करण्याकरिता दिनांक 11जुलै 2017 मंगळवार रोजी दुपारी 1 ते 3 वाजता समितीचे सदस्य आणि संबंधित अधिका–यासमवेत प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल. प्रत्यक्ष पाहणीत काय आढळून आले या अनुषंगाने 15 दिवसात बैठक लावण्यात येईल त्यात संबंधित अधिका–यांना बोलविण्यात यावे असे सुचित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती**

**स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची बुधवार दिनांक 12.07.2017 रोजी दुपारी 2.30 वाजता सिव्हिल कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.संजय बंगाले, मा.उपसभापती श्री.अभय गोटेकर, श्री.शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम, मा.सदस्या श्रीमती पल्लवी शामकुळे, श्रीमती रश्मि धुर्वे, श्रीमती विद्या कन्हेरे तसेच विभागाकडून सहा संचालक, नगररचना श्रीमती थुल, नगररचनाकार श्री.सोनारे, उप अभियंता श्री.धनकर, उपअभियंता श्री.निमजे, शाखा अभियंता, श्री.देशपांडे. स्थापत्य अधिकारी सहा.श्री.गुरमुले, स्थापत्य अधिकारी सहा.श्री.गौतम उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. मा.सभापती यांनी विषय क्र. 1 नुसार म.न.पा.च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. 33 अंतर्गत औद्योगिक विभागातील जागेसंदर्भात सभेने वरील विषय स्थापत्य व प्रकल्प समितीकडे यथायोग्य निर्णय घेण्याबाबत निर्देश दिले त्या अनुषंगाने महापालिका ठराव क्र. 45 दिनांक 20.06.2017 अन्वये नागपूर शहराचा मंजूर विकास नियंत्रण नियमावली 2000 मधील नियम क्र. 14.2.1 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये खालील प्रमाणे फेरबदल करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता सभागृहाच्या मंजूरीकरिता ठेवला असता सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार या विषयाचा अभ्यास करून महापालिकेस शिफारस करण्याकरिता उपरोक्त ठराव स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीकडे पाठविण्यात आला आहे असे सांगितले.

उपरोक्त ठरावाचे अध्ययन करून ठरावामध्ये नमूद नियम क्र.14.2.1(b) मध्ये सुचविलेल्या दुरूस्तीमधील (b) (i)) वाणिज्य विभागातील सर्व अनुज्ञेय वापर वाणिज्य विभागातील अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांसह वापरता येईल. परंतु निवासी तसेच गैर वाणिज्य वापराकरीता दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक शिघ्र सिध्द गणकातील विकसीत जमिनीच्या दराच्या 20% ऐवजी 10% प्रिमीयमचा भरणा करावा लागेल. पुर्णपणे वाणिज्य वापराकरीता दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक शिघ्र सिध्द गणकातील विकसीत जमिनीच्या दराच्या 40 % ऐवजी 20% प्रिमीयम भरणा करावा लागेल.

अनुक्रमांक 3, Regulation No0 14.2.1(b)मधील पोट कलम (ii) However Provision shall be made for convenience shopping as per provisions of Rule No0 13-6 ही तरतुद वगळण्यात यावी.

तसेच अनुक्रमांक 11 वरील Note (iii) मध्ये Built up area up to 50 sq.mtrs. ऐवजी Built up area up to 80 sq.mtrs.असा बदल करणे.

अशा प्रकारची दुरूस्ती करून उपरोक्त प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव योग्य व समर्पक असल्यामुळे उपरोक्त प्रस्तावात अशाप्रकारची दुरूस्ती करून हा प्रशासनाचा प्रस्ताव मंजूर करण्याची ही समिती एकमताने शिफारस करीत आहे.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती**

A-7 1/11

# विषयाचे प्रारूप

मनपा ठराव क्र.45 अन्वये दिनांक 20.06.17 अन्वये महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची दिनांक 12.07.2017 रोजी भरलेल्या खालील सभेच्या अहवालास मंजूर करण्याचा प्रश्न विचारात घेणे

**अहवाल**

महापालिका ठराव क्र. 45 दिनांक 20.06.2017 अन्वये नागपूर शहराचा मंजूर विकास नियंत्रण नियमावली 2000 मधील नियम क्र. 14.2.1 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये खालील प्रमाणे फेरबदल करण्यासाठी प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता सभागृहाच्या मंजूरीकरिता ठेवला असता सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार या विषयाचा अभ्यास करून महापालिकेस शिफारस करण्याकरिता उपरोक्त ठराव स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीकडे पाठविण्यात आला होता.

उपरोक्त ठरावाचे अध्ययन करून ठरावामध्ये नमूद नियम क्र.14.2.1(b) मध्ये सुचविलेल्या दुरूस्तीमधील (b) (i)) वाणिज्य विभागातील सर्व अनुज्ञेय वापर वाणिज्य विभागातील अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांसह वापरता येईल. परंतु निवासी तसेच गैर वाणिज्य वापराकरीता दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक शिघ्र सिध्द गणकातील विकसीत जमिनीच्या दराच्या 20% ऐवजी 10% प्रिमीयमचा भरणा करावा लागेल. पुर्णपणे वाणिज्य वापराकरीता दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या वार्षिक शिघ्र सिध्द गणकातील विकसीत जमिनीच्या दराच्या 40 % ऐवजी 20% प्रिमीयम भरणा करावा लागेल.

अनुक्रमांक 3, Regulation No0 14.2.1(b)मधील पोट कलम (ii) However Provision shall be made for convenience shopping as per provisions of Rule No0 13-6 ही तरतुद वगळण्यात यावी.

तसेच अनुक्रमांक 11 वरील Note (iii) मध्ये Built up area up to 50 sq.mtrs. ऐवजी Built up area up to 80 sq.mtrs.असा बदल करणे.

अशा प्रकारची दुरूस्ती करून प्रशासनाने सादर केलेला उर्वरित प्रस्ताव योग्य व समर्पक असल्यामुळे उपरोक्त प्रस्तावात अशाप्रकारची दुरूस्ती करून हा प्रशासनाचा प्रस्ताव मंजूर करण्याची ही समिती एकमताने शिफारस करीत आहे.

**स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची गुरूवार दिनांक 13.07.2017 रोजी दुपारी 2.30 वाजता सिव्हिल कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या** सभेचा अहवाल.

**सभेत मा.सभापती श्री.संजय बंगाले, श्री.शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम, मा. सदस्या श्रीमती पल्लवी शामकुळे, श्रीमती रश्मि धुर्वे तसेच विभागाकडून उद्यान अधिक्षक श्री. माटे, कनिष्ठ अभियंता(स्थापत्य व बांधकाम) श्री.बांते, उद्यान निरीक्षक श्री. अमोल चौरपघार, उद्यान निरीक्षक श्री. अनंता नागमोते आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. उद्यान विभागा अंतर्गत नागपूर शहरातील विविध उद्यानामधील स्थापत्य व बांधकामे तसेच कर्मचारी सद्यःस्थिती व देखरेख आणि दुरूस्ती करणारे कंत्राटदार यांची माहिती घेण्याच्या दृष्टीने सभा बोलाविली असल्याचे मा. सभापती यांनी सांगितले. त्या अनुषंगाने मागच्या वर्षी स्थापत्याची किती कामे होती, किती कामांचे वर्कआर्डर झाले आणि किती बगीच्याचे काम करण्यात आली, त्या कामाची सध्या स्थिती काय?कार्यदेश देण्यात आलेली कामे दिलेल्या अवधीत पुर्ण केली जातात काय? अपुर्ण कामांना कॅरीफारवर्ड केली जातात त्यांना पुन्हा प्रस्तावित केले आहे काय?तसेच उद्यानासाठी आलेल्या शासकीय निधीतून किती ठिकाणी बगिच्याची कामे करण्यात आली. म.न.पा.च्या किती उद्यानात शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच किती उद्यानात सुरक्षा रक्षक ठेवण्यात आले आहेत अशी विचारणा केली असता कनिष्ठ अभियंता यांनी लेखी माहिती पुरविल्यानंतर माहिती देतांना सांगितले की मनपाचे एकुण 95 उद्याने आहेत. स्थापत्य कामांच्या संदर्भाने मा. नगरसेवकांचे जसजसे प्रस्ताव येतात त्याप्रमाणे कामे केली जातात. सध्या 20 उद्यानात स्थापत्य संबंधित कामे सुरू आहेत. कार्यदेश दिलेल्या फक्त विद्युत संबंधी कामे कॅरीफॉरवर्ड केली जातात. शासकीय निधीतून 5 उद्यानात कामे सुरू आहेत. मनपाच्या 45 उद्यानामध्ये शौचालयाची व्यवस्था आहे बाकी छोटे उद्यान असल्यामुळे तेथे जागेच्या अभावी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली नाही एखादे वेळेस मा.सदस्यांनी शौचालयाच्या संदर्भात प्रस्ताव जरी दिला तर त्या ठिकाणी तेथेल्या नागरिकांकडून शौचालय स्थापनेसंबंधी विरोध दर्शविल्यामुळे काम होत नाही असे सांगितले

त्यानंतर उद्यान अधिक्षक यांनी माहिती देतांना सांगितले की एकुण उद्यानाकरिता 39 सुरक्षा रक्षक असून मधल्या काळात सुरक्षा रक्षक कमी करण्यात आले तसेच बहुतेक सफाई कर्मचारी सुध्दा सेवानिवृत्त झाल्यामुळे कर्मचा–यांची मोठया प्रमाणात कमतरता आहे. या अनुषंगाने पोस्ट भरण्याचा संदर्भातील प्रस्ताव विभागाला पाठविण्यात आलेला आहे. म.न.पा. शौचालयाच्या साफसफाईकरिता एक कंपनीला काम दिलेले आहे. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत सगळया उद्यानामध्ये शौचालय बांधण्याचे काम करीत आहे. उद्यानामध्ये कंपोस्ट खत तयार करण्याचा प्रकल्पासाठी महिला बालकल्याण विशेष समिती सहकार्य करीत आहे. यासाठी महिला बचत गटाच्या मार्फत कंम्पोस्ट खत निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात येत आहे असेही त्यांनी माहिती दिली.

तद्नंतर मा.सदस्य श्री.शेख मो.जमाल मो.इब्राहीम यांनी झाडांच्या फांदया तोडण्याच्या संदर्भात कोणत्याप्रकारची कार्यवाही न होता त्याचा पाठपुरावा सुध्दा केला जात नाही असे सांगितले. ज्या कंत्राटदाराला काम दिलेले आहे त्यांचा कर्मचारी पुर्ण झाड कापण्याची तयारी दाखवितो मात्र फांदया तोडण्याची त्याची इच्छा राहत नाही तसेच कापलेल्या फांदयाची उचल सुध्दा ते करीत नाही यावर अटकाव करण्यात यावा आणि मा.सदस्यांनी केलेल्या तक्रारीवर कार्यालयाकडून अंमलबजावणी करण्यात यावी असेही ते म्हणाले.

म.सदस्या श्रीमती पल्लवी शामकुळे यांनी सभेत सुचविले की म.न.पा.उद्यानात फिरणा–या नागरिकांच्या अनुसरून सकाळी 6.00 वाजता आणि त्यानंतर दुपारी अशा दोन्ही वेळेस उद्यानातील शौचालयाची स्वच्छता करण्यात यावी. स्थापत्य कामाच्या यादीची प्रत सगळया मा.सदस्यांना देण्यात यावी. झाडाच्या फांद्या कापण्याच्या अनुषंगाने दिलेल्या पत्रानुसार लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी. तसेच उद्यानात टाकण्यात आलेल्या ग्रीन जीमची रखरखाव व देखरेख करण्यात यावी. आमदार निधीतून प्रभाग 72 मध्ये होत असलेल्या दुर्गा मंदीरचे काम संपन्न झाल्यानंतर उद्घाटनासाठी प्रभागातील सर्व नगरसेवकांना निमंत्रित करण्यात यावे.

मा.सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे यांनी सुगत नगर कॉलनीमध्ये विहाराच्या बाजूला म.न.पा.चे उद्यान असून त्या उद्यानात मुलांना खेळण्यासाठी मज्जाव करण्यात येतो म्हणून मोठया प्रमाणात नागरिकांच्या तक्रारी आहेत. करिता या उद्यानात मुलांना खेळण्यासाठी प्रतिबंध करण्यात येवू नये असे सांगितले.

शेवटी मा.सभापती यांनी संबंधितांना निर्देशित केले कि, म.न.पा.च्या उद्यानामध्ये नगरसेवक आणि पदाधिका–यांनी दौरा केला असता तेथील जेष्ठ नागरिकांनी उद्यानातील शौचालयाच्या संदर्भात तक्रारी केल्या. आरोग्य विभागाच्या माध्यमातून जे रेजा, मजदूर काम करतात त्यांच्यामार्फत सकाळी 6.00वाजता आणि सायंकाळ होण्यापूर्वी अशी दिवसातून दोनदा शौचालयाची सफाई करण्यात यावी असा समितीचा निर्णय असून यासंदर्भातील पत्र उद्यान अधिक्षकामार्फत झोनल अधिका–यांना पाठविण्यात यावे आणि मा.आयुक्त आणि मा. उपायुक्त यांना सुध्दा एक प्रतिलिपी पाठविण्यात यावी. अशी समितीची सुचना आहे. शौचालय स्वच्छता, ग्रीम जीम, उद्यानात लावण्यात आलेली खेळणी, झाडे कापण्याच्या संदर्भात कंत्राट दिलेल्या कंत्राटदारावर संबंधित अधिका–याचे नियंत्रण असले पाहिजे. मा.सदस्यांकडून आलेल्या तातडीच्या तक्रारीवर अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्य झाले पाहिजे. मा.सदस्यांनी ज्या ज्या सुचना केल्या त्याचे पालन करण्यात यावे असे सुचित करून मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती
15/07/2017

मा.महापौरजी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची मंगळवार दिनांक 01.08.2017 रोजी दुपारी 2.30 वाजता डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती,स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

सभेत मा.महापौरजी, मा.सभापती संजय बंगाले, उप सभापती श्री. अभय गोटेकर, मा.सदस्या श्रीमती पल्लवी शामकुळे, मा.सदस्य श्री. मो.जमाल मो.इब्राहीम, मा.सदस्या श्रीमती विद्या कन्हेरे, मा.सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे आणि प्रशासनाकडून मुख्य अभियंता श्री.बनगीनवार, सहा. संचालक, नगररचना,श्रीमती थुल, अधिक्षक अभियंता श्री.जामगडे, कार्यकारी अभि. श्री. जांभुळकर, कार्यकारी अभि.प्रकल्प श्री. चौगंजवार, कार्यकारी अभियंता श्री.कुकरेजा, सर्व झोनचे सहा.आयुक्त आयुक्त उपस्थित होते.

मा.महापौरजी यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला विषयपत्रिकेवरील विषयाचा झोननिहाय आढावा घेण्यास सुरूवात करण्यात आली. 30 वर्षापूर्वी तयार झालेल्या इमारतीचा स्ट्रक्चरर ऑडीट तयार करण्यात आला आहे काय? तयार करण्यात आला असल्यास त्याची माहिती देण्याविषयी सांगण्यात आले.

अधिक्षक अभियंता श्री.जामगडे यांनी माहिती देतांना सांगितले कि, महाराष्ट्र अधिनियम अंतर्गत कलम 265(अ)अन्वये 30 वर्ष जुन्या व 50 टक्केपेक्षा जास्त वापराखालील असलेल्या इमारतीचा स्ट्रक्चरर ऑडीट करण्याबाबत कायदयामध्ये तरतूद आहे. त्याप्रमाणे शासनाने नियम तयार करून दिलेले आहे त्यानुसार 11 बांधकाम अभियंता नियुक्त करण्यात आले आहे. ही कार्यवाही मुख्य अभियंत्यामार्फत करण्यात येते. यासाठी मुख्य अभियंता आणि सहा.आयुक्त झोन यांना प्राधिकृत केले आहे या अनुषंगाने 2013 मध्ये डेलीगेशन तयार झालेले आहे. या अनुषंगाने घर मालकाकडून स्ट्रक्चरर ऑडीट करावयाचे आहे जर त्यांनी केले नाही तर महानगरपालिकेला करून घ्यावयाचे आहे. त्याकरिता निधीची तरतूद सुध्दा करण्यात आली आहे.

लक्ष्मीनगर झोन क्र. 1 च्या सहा.आयुक्त मार्फत सांगण्यात आले की 30 वर्ष जुन्या झालेल्या इमारती झोन अंतर्गत आढळल्या नाही. झोन क्र. 4 धंतोली मध्ये मेहाडिया बिल्डींगचे स्ट्रक्चरर ऑडीट करण्यात आले होते त्यानंतर तो भाग धरमपेठ झोनला ट्रान्सफर झाला. त्या प्रकरणात वेगवेगळे अंकेक्षण अहवाल प्राप्त झाल्यामुळे न्यायालयात प्रकरण असून त्याव स्थगितीचा आदेश मिळालेला आहे. झोन अंतर्गत 13 जीर्ण इमारती असून त्या सर्वांना नोटीस बजाविण्यात आली आहे. त्यापैकी दोन इमारतीवर कारवाईदेखील करण्यात आली. मॉडेल मीलच्या इमारतीला सुध्दा नोटीस दिली गेली असल्याचे सांगण्यात आले असता मा.महापौरजी यांनी मॉडेल मीलची इमारतीच्या संदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देशित केले.

मा.सभापती यांनी सुध्दा जीर्ण इमारतीबद्दल जी काही झोन स्तरावरून कारवाई होईल त्याबाबत समितीला कळविण्यात यावे असे संबंधितांना सुचित केले.

गांधीबाग झोन क्र 6 मध्ये 89 इमारतींना नोटीस दिल्या असून 59 घरांवर कारवाई करण्यात आली आहे. सतरंजीपुरा झोन क्र. 7 मध्ये दोन धोकादायक इमारती असून दोन्ही इमारतींवर कारवाई करण्यात आली आहे. लकडगंज झोन झोन क्र. 8 मध्ये दोन धोकादायक इमारती असून त्या इमारतींवर कारवाई करण्यात आली. आशीनगर झोन क्र. 9 मध्ये 12 इमारतींना नोटीस दिलेली आहे. 7 प्रकरणांत दुरूस्ती सुचविलेली आहे आणि त्या दुरूस्त्या पुर्ण केलेल्या आहेत. 3 प्रकरणांपैकी 2 प्रकरणांत कार्यवाही केलेली आहे. मंगळवारी झोन क्र. 10 मध्ये 21 धोकादायक इमारती असून सातपैकी एका इमारतींवर कारवाईचे काम प्रलंबित आहे तर सहा इमारतींचा प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे अशी माहिती संबंधित सहा.आयुक्त यांनी मा. महापौरांना दिली.

मा. उप सभापती यांनी हनुमाननगर झोन येथील दुर्गानगर प्राथमिक शाळेच्या इमारतीला मोठा तडा गेला असल्याने ही अत्यंत गंभीर बाब असून कायवाई करण्याविषयी सुचविले. तसेच पराते कार्नर खामला रोड येथे मोठी हाऊसिंग स्किम असून आजपर्यंत कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी रामदासपेठ येथील 11 मजली असलेल्या कल्पना बिल्डिंगवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात न आल्याने या इमारतीला नोटीस देण्याविषयी संबंधितांना सुचविले. धरमपेठ झोन अंतर्गत भगवाघर कॉम्प्लेक्स मध्ये जी काही घटना झाली त्या अनुषंगाने सहा. आयुक्तांनी या संदर्भात मोठी जबाबदारी असून याबाबत काही तरी भुमिका ठरवावी लागेल असेही ते म्हणाले. धंतोली भागात आर्शिवाद बिल्डिंग, धंतोली पार्क येथे 13 वर्षापासून एक परिवार इमारतीच्या टॅरेसवर राहत आहे त्यामुळे तेथील रहिवाश्यांना त्याचा त्रास होतो आहे याबाबत सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच बर्डी येथील मोठया इमारतीच्या बाबतीत ओनर आणि बिल्डर यांच्यातील वादामुळे इमारतीच्या अर्धवट बांधकामामुळे बेसमेंटमध्ये पावसाचे पाणी साचते त्यामुळे तेथे मच्छरांचा प्रादुर्भाव होतो आणि नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास राहन करावा लागतो. झोन स्तरावर तक्रारी देण्यात आलेल्या आहेत परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. अशा प्रकारे नागपूर शहरात अशी किती प्रकरणे आहेत. ज्याचा नकाशा मंजुर न झाला असल्यास त्या अनुषंगाने शिक्षा किंवा पेनॉल्टी लावण्यात आलेली आहे अशी विचारणा केली असता कलम 53 व 54 अन्वये त्यावर कारवाई करण्याचा अधिकार झोन आयुक्तांना दिला असल्याचे सहा.संचालक, नगररचना मार्फत सांगण्यात आले.

30 वर्ष जुन्या इमारतीच्या संदर्भात राज्य सरकारने 2013 मध्ये महानगर अधिनियम अंतर्गत कलम 265 (अ)अन्वये महापालिकेने केलेल्या बांधकामाच्या अंकेक्षणाची माहिती मा. महापौरजी यांनी सहा. आयुक्तांना विचारली असता चर्चेदरम्यान आलेल्या माहितीच्या आधारे झोन स्तरावरून कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही झाली नसल्याबाबतची बाब लक्षात आल्यानंतर मा. महापौरजी यांनी प्रशासनाला विचारणा केली असता प्रशासनाने तीन आठवडयाचा अवधी

मागितला. त्यावर महापौरांनी संमती दाखवत तीन आठवडयात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

तसेच महाराष्ट्र अधिनियम अंतर्गत कलम 265(अ)अन्वये महापालिकेने नियुक्त केलेल्या 11 स्ट्रक्चरल डिझायनर्स यांना झोनअंतर्गत धोकादायक इमारतींना भेट देवून त्याचे अंकेक्षण अहवाल तपासण्यात यावे तसेच एकुणच धोकादायक इमारतींचा अहवाल तातडीने सादर करण्यात यावे असे निर्देशित करून शहरामध्ये वाढत्या साथीच्या रोगाचे प्रमाण लक्षात घेता अर्धवट स्थितीत असलेल्या बांधकाम इमारतीमध्ये पावसाचे पाणी साचते त्यामुळे तेथे मच्छरांचा प्रादुर्भाव होतो. अशा इमारतींवर होणारा कार्यवाहीचा आढावा घेतला असता कलम 53 व 54 अन्वये त्यावर कारवाई करण्याचा अधिकार झोन आयुक्तांना असल्याने अशा इमारतींचा शोध घेऊन त्याची माहिती सादर करण्याचे निर्देशित केले.

६ १३

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती

**म.न.पा.ठराव क्र.8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3), नुसार गठीत स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची सभा गुरुवार दि.12/10/2017 रोजी दुपारी 12.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृह येथे संपन्न झाली त्या सभेतील चर्चेचा संक्षिप्त वृतांत.**

**सभेत मा.सभापती स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती श्री.संजय बंगाले, मा.उपसभापती श्री.अभय गोटेकर, मा.सदस्या श्रीमती विद्या कन्हेरे, मा.सदस्या श्रीमती पल्लवी शामकुळे, मा.सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे प्रशासनाकडुन मा.सहा.संचालक, नगररचना श्रीमती सुप्रिया थुल, तसेच संबधित अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

मा.सभापती, यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली, सभेच्या सुरुवातीस सांगण्यात आले की, दोन महिन्यापुर्वी मनपा सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र 24 अंतर्गत नागपूर शहरामध्ये मोबाईल टॉवर उभारण्याचा विषय सभागृहामध्ये आला होता त्या अनुषंगाने मागील 3 ते 4 वर्षापासुन आलेले अर्ज नियमाप्रमाणे आहे कींवा नाही याची संबंधित विभागाने तपासणी केली असता सर्व अर्ज रिजेक्ट करण्यात आले या संदर्भातील मार्गदर्शक तत्व काय आहे व या विषयाची संपुर्ण चौकशी करण्याकरिता मागच्या सभागृहाने 2 ते 3 विषयावर निर्णय घेण्याकरिता हा विषय स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीकडे पाठविला आहे त्याअनुषंगाने नागपूर शहरात उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे काय निर्देश आहे? 2014 नंतर उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरमध्ये अधिकृत परवागी दिलेले किती टॉवर्स आहे त्यामध्ये रेडीओ फिक्वेन्सी टेलीकॉम डिपार्टमेंटशी संबंधित ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे काय ? यामध्ये राज्य शासन व केंद्र शासनाचे काय शासन निर्णय आहे ? मोबाईल टॉवरला परवानगी देतांना आपले मार्गदर्शक तत्व काय आहे ? या संपुर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती सहा.संचालक नगररचना यांनी दयावी.

सहा.संचालक नगररचना यांनी मोबाईल टॉवरच्या संदर्भात माहिती देतांना सांगितले की, 2014 पासुनची माहिती मनपा सर्वसाधारण सभेमध्ये मागितली होती त्या अनुषंगाने 2014 नंतर एकही परवानगी मोबाईल टॉवरला देण्यात आलेली नाही. त्या संदर्भात मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाने पारीत केलेल्या आहेत राज्य शासनाने 2014 मध्ये पॉलिसी काढली होती त्यामध्ये निर्देश देण्यात आले होते दिनांक 04/03/2014 अन्वये महाराष्ट्रामध्ये संपुर्ण महानगरपालिका आणि नगरपरिषदा मध्ये एकच पॉलिसी लागु करण्यात आली त्या मधले नियम महानगरपालिका आणि नगरपरिषद साठी सारखेच होते (सभेत 2014 रोजी राज्य शासनाने पारीत केलेल्या पॉलीसीचे वाचन करण्यात आले) महानगरपालिकेने सन 2009 मध्ये पॉलिसी केली होती तत्कालीन मा.आयुक्तांनी त्यामध्ये मार्गदर्शक

सुचना काढल्या होत्या त्यामध्ये शुल्क किती आकारायची होती ते निर्धारित केले होते त्यामध्ये जर नियमाचे उल्लंघन केले होते त्याचे शुल्क वेगळे घेण्यात येत होते त्यामध्ये एक लाख रुपये प्रती टॉवर या प्रमाणे शुल्क आकारण्यात आलेला होतो त्यावेळी केंद्र शासन आणि राज्य शासनाचे मोबाईल टॉवर संदर्भात कुठलेही निर्देश नव्हते. तदनंतर मा.उच्च न्यायलयाचा दि.12 सप्टेंबर 2014 चा आदेश आहे. (आदेशाचे वाचन करण्यात आले) मा.उच्च न्यायलयाचा आदेश व केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा शासन निर्णय त्या प्रमाणे जॉइंट डायरेक्टरचे पत्र होते दि.17 नोव्हेंबर 2017 रोजीचे त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की 12 सप्टेंबर 2014 प्रमाणे कार्यवाही करावी त्यानुसार पुढील कार्यवाही नगररचना विभागातर्फे करण्यात येत आहे. सन 2009 च्या मार्गदर्शक तत्वानुसार एकुण 16 कंपन्यांचे 260 मोबाईल टॉवर उभारण्यात आले होते त्यांच्याकडुन प्रति 1 लक्ष रुपये या प्रमाणे 6 कोटी 16 लक्ष रुपयांचा शुल्क घेण्यात आले होते व तात्पुरती परवानगी 3 वर्षाची होती त्यानंतर त्यांना नुतणीकरण करुन घेणे आवश्यक होते त्या संदर्भात कनिष्ठ अभियंता यांनी त्रुटणी अहवाल तयार केलेला आहे.

नागपूर शहरात एकदंर मनपा क्षेत्रात उभारण्यास आलेले मोबाईल टॉवर 260 परवानाग्या पैकी 241 परवानगी रद्द करण्यात आल्या आहेत. वरील विषयात कोणत्याही इमारतीत भोगवटा प्रमाणपत्र, बांधकाम मंजुरीचा नकाशा, 70% गाळे धारकांचे संमतीपत्र आदि बाबी पूर्ण नसल्याने नामंजूर करण्यात आल्या आहेत आणि मनपा अधिनियम' अंतर्गत मोबाईल टॉवर हे टॅक्स युनिट अंतर्गत येत असल्याने कलम 267(A) अंतर्गत मोबाईल युनिट संच मेटल बॉडीचा असल्याने 2011–12 पासून बिल्डींग ला येणारा Property Tax च्या दूप्पट शास्ती प्रत्येक वर्षाला 2011–12 पासून 2017–2018 पर्यंत 7 वर्षाची शास्ती लाऊन Tax नोटीस देऊन उपरोक्त दंड वसूल करावा

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची

म.न.पा. ठराव कमांक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3) नुसार गठीत स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची सभा शनिवार दिनांक 18.11.2017 रोजी दुपारी 12.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेत समितीचे सभापती श्री संजय बंगाले, उपसभापती श्री अभय गोटेकर, सदस्या श्रीमती सुषमा चौधरी, सदस्या श्रीमती पल्लवी श्यामकुळे, सदस्या श्रीमती रश्मि धर्वे, मा. सदस्य श्री किशोर जिचकार, मुख्य अभियंता, सहा. संचालक नगररचना विकास अभियंता, श्री नेरल कार्यकारी अभियंता श्री भुतकर, कार्य. अभियंता चौगजकर, श्री कुकरेजा, तथा इतर अधिकारी उपस्थित होते.

सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय कमांक 1 ठराव कमांक 132 नागपुर सुधार प्रन्यास अंतर्गत 572 व 1908 अभिन्यास मधील विविध विकास कामे प्रलंबित आहेत त्या संदर्भात सभेत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावर विभागाव्दारे विस्तृत माहिती देण्यात आली मा. सदस्यांचा या संदर्भात रोष असल्याची माहीती मा. सभापती व्दारे देण्यात आली. जे लेआउट म.न.पा. ला हस्तांतरीत झाले नाही किंवा अनअथोराईज्ड आहे अशा लेआउट मध्ये मनपा. काम करीत आहे. यावर विभागाव्दारे स्पष्टीकरण देण्यात आले की मा. आमदार मा. खासदार यांच्या निधीतुन कामे होत आहे परंतु काम करणारी ऐजंसी ही नागपूर महानगरपालिका असल्यामुळे गैरसमज झालेला आहे. यासंबंधी होत असलेल्या कामाच्या संबंधीत माहितीसह अहवाल देण्याचे निर्देशित करण्यात आले. तसेच सभापती यांनी माहीती दिली की मनपा ठरावानुसार जे समितीशी संबधीत विषय राहतील ते सदनापुढे जाण्यापुर्वी समितीत चर्चीले जाणार आहे. कार्यकारी अभियंता यांनी काम थांबविले या आरोपचे स्पष्टीकरण कार्यकारी अभियंता यांनी सभेत दिले.

विषय कमांक 2 ठराव कमांक 121 अन्वये नागपूर महानगरपालिका सिमा क्षेत्रातील मेट्रो रेल्वे कामामुळे रहदारीस होणारे अडथळा संदर्भात तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोणातुन आढावा या विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी रहदारीस अडथळा तथा सुरक्षा संबधात दुर्लक्षा करीता सभापती यांनी आपली नाराजी व्यक्त केली या संदर्भात मा. सदस्यांच्या नागरिकांच्या असलेल्या तकारीचे ज्यात बॅरीगेटस ,फुटपाथ आकूपाय,गड्ढे, खराब रस्ते यांचे वर्णन केले. यावर उपाय म्हणुन समन्वय साधण्याच्या दृष्टिकोणातुन 15 दिवसाच्या आत मेट्रो महानगरपालीका, पोलीस विभाग, यांचेसह संयुक्त सभेचे आयोजन करण्यात यावे सर्व

SM

कामाचे निरीक्षण करण्याची व्यवस्था करण्यात यावी यावर निरंतर समन्वयाकरीता एक ज्वाईंट कमेटी बनविण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्रमांक 3 ठराव क्रमांक 127 नागपूर मनपा अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत सिमेंट रोड व इतर कामाच्या खर्चावर महालेखाकार कार्यालय ( लेखा परिक्षा) महाराष्ट्र यांनी घेतलेल्या आक्षेपावर सखोल चर्चा या विषयाच्या संदर्भात प्र.लो.वि.अ.विभागातर्फे विस्तृत माहीती दिली ऑडीट आक्षेपाचे उत्तर देण्यात आले आहे या संदर्भात आर्बीट्रेटर नियुक्त करण्याबाबत माहिती देण्यात आली. लेखा परिक्षा विभागाने मनपा ने केस परत का घेतली या संदर्भात आक्षेप घेतले आहे त्यांचे म्हणने आहे या संदर्भात अपील करायला हवी. सभापती यांनी या संदर्भात मा. सदस्यांनी विचारलेली प्रश्नाची संपूर्ण माहिती सदस्यांना देण्यास सांगीतले या संदर्भात महानगरपालिकेला कोणतीही पेनॉल्टी लागू नये महानगरपालिकेचे कोणतेही आर्थीक नुकसान होवू नये या दृष्टिने कार्यवाही करण्याचे निर्देशित केले.

विषय क्रमांक 4 ठराव क्रमांक 128 नरखा साथ येथील सिव्हर लाईन संदर्भात मनपाने तांत्रिक विशेषज्ञांचा सल्ला व इतर सविस्तर उपाययोजना संदर्भात चर्चा व आढावा घेण्यात आला. या विषयावर विभागाव्दारे माहिती देण्यात आली प्रकल्पाचे डीपीआर मंजूर असल्याचे सांगण्यात आले प्रकल्प या संदर्भात आडमार्गीवर उपाय योजना सभा घेवून काढण्यात याव्या असे सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्रमांक 5 ठराव क्रमांक 122 स्मार्ट सिटी अंतर्गत मनपा क्षेत्रात वेगवेगळ्या कंपनी अंतर्गत करण्यात आलेले खोदकाम /कामाचा कालावधी/अपूर्णकामे त्यामुळे मनपास होणारा आर्थीक भुर्दंड या संदर्भात सविस्तर आढावा या विषयावर मा.विरोधी पक्षनेता यांनी प्रश्न विचारलेला आहे अशी माहिती देण्यात आली. यासंदर्भात झालेल्या खोदकामास कुणी परवानगी दिली आहे असे विचारले असता कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली की ही मंजूरी ही स्मार्ट सिटी यांच्या सहमतीने देण्यात आलेली या संदर्भात काय करारनामा करण्यात आलेला आहे त्यांची माहिती त्यांना नाही. खोदकामाचे रिस्टोरेशन व्यवस्थीत होत आहे की नाही हे देखरेख त्यांच्याकडे आहे. विभागाने यावेळी माहिती दिली की आयुक्तांशी ह्या विषयावर सभा झाली होती त्यांनी जसे आहे तसे रिस्टोरेशन करण्याचे निर्देशित केले होते. या संदर्भात सर्व संबंधीत अधिकारी त्यांचेसह एक सभा घेण्यात यावी सर्व संबंधीत अधिका-यांना आपल्या तक्रारी तसेच सभेचे पत्र पाठविण्यात यावे. ह्या सर्व कामात कोणते ॲग्रीमेंट झाले आहे ह्या बाबत माहिती घेण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले. ह्या संबंधी काम होतांना संबंधीत नगरसेवकाला विश्वासात घेणे आवश्यक आहे असे सांगण्यात आले. या दरम्यान उपसभापती यांनी तक्रारी केली की चेंबर हे 1 फुट उंच केलेले

आहे त्यामुळे लोकांच्या वाहनाचे नुकसान तसेच जिवहानी होण्याची शक्यता आहे त्यावर उचित प्रतिबंधात्मक उपायाचा अवलंब करण्यात यावा.

विषय क्रमांक 6 महाराष्ट्र अधिनियमातील 1 जे प्रमाणे मा. सदस्य श्री किशोर जिचकार यांचा नोटीस संदर्भात राहाटे कॉलोनी चौक वर्धा रोड येथील मोकळ्या जागेवर राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याच्या संदर्भात चर्चा या विषयावर मा. सदस्य किशोर जिचकार यांनी वर्धा रोड रहाटे कॉलनी चौकातील एका कोपऱ्यात राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्याच्या संदर्भात मागणीवर सभापती यांनी संबंधीत जागेची मालकी बाबत जिल्हाधिकारी यांची माहिती काढावी तसेच रस्त्याच्या कडेला पुतळा बसविण्यासंबंधी नियमाची माहिती घेवून समितीला देण्यात यावी असे निर्देशित केले.

यानंतर सभेचे समापन करण्यात आले.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष

म.न.पा.ठराव क्र.8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3), नुसार गठीत स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची सभा सोमवार दि. 15/01/2018 रोजी दुपारी 12.00 वाजता सिव्हील कार्यालयातील स्व.डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृह येथे संपन्न झाली त्या सभेतील चेर्चेचा संक्षिप्त वृतांत.

सभेत मा.सभापती स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती श्री.संजय बंगाले, मा.उपसभापती श्री.अभय गोटेकर, माजी महापौर, श्री.प्रविण दटके, मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे, मा.सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे प्रशासनाकडुन मा.अति.उपायुक्त श्री. राजेश मोहिते, प्रमुख लेखा व वित्त अधिकारी श्रीमती मोना ठाकुर, स्थावर अधिकारी श्री.भुते, मा.सहा.संचालक, नगररचना उपअभियंता श्री.कमलेश चव्हान, संबधित अधिकारी वर्ग उपस्थित होते.

मा.सभापती, यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली, सभेच्या सुरुवातीस सांगण्यात आले की, नागपूर महानगरपालिकेच्या संपत्तीच्या मिळकतीचा अभिलेख अद्यावत करणे व त्यांचे अंकेक्षण करण्यासंदर्भात महानगरपालिकेला मिळालेली राज्य शासनाची जागा असेल, किंवा नागपूर सुधार प्रन्यास कडुन मिळालेली जागा असेल, खाजगी मालकीच्या जागा असेल या सर्व जागांचे अंकेक्षण झाले काय किंवा त्याची सिटी सर्व्हेमध्ये नोंद करण्यात आली आहे काय या संदर्भात सविस्तर माहिती संबंधित अधिका–यांनी दयावी

स्थावर अधिकारी श्री.भुते यांनी माहिती देतांना सांगितले की, एकुण 22 लेआउट आहे त्यामध्ये 3,734 भुखंड महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. आवटंन प्रक्रीयेव्दारे स्थायी लिजपट्टे रहिवासी वापराकरीता देण्यात आले आहे. या सर्व भुखंडाचे लिज रेंट वसुल करणे हे प्रामख्याने स्थावर विभागाचे काम आहे. परंतु त्यामध्ये असे निर्देशनास आले की स्लम भागातील 2800 भुखंड आहे त्यामध्ये हायर परचेस ॲग्रीमेंटचा आधार घेवुन आवंटन प्रक्रीया करण्यात आलेली आहे.

हायर परचेस ॲग्रीमेंटचा लॅन्ड रेकॉर्ड स्थावर विभागाकडे असायला पाहिजे त्या ॲग्रीमेंटमध्ये कोणत्या अटी आणि शर्ती होत्या, आवटंन प्रक्रीया करीत असतांना अटी आणि शर्तीनुसार ॲग्रीमेंट किती वर्षाकरीता करण्यात आला, त्याला रेगुलराईज करण्याच्या दृष्टीने व केसेसचा निपाटारा करण्याकरीता स्थावर विभागाकडुन तसा प्रस्ताव तयार करुन लवकरात लवकर धोरण तयार करावे, कुठलाही प्रस्ताव करीत असतांना तो स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीच्या माध्यमातुन पुढे सभागृहात पाठविण्याचे निर्देश मा.सभापती यांनी दिले.

महानगरपालिकेच्या प्रत्येक संपत्तीचे सिटी सर्व्हे नुसार अभिलेख उपलब्ध करणे किंवा महानगरपालिकेच्या अभिन्यासातील जेवढे भुखंड आहे त्याची 7/12 वर नोंद घेण्यात यावी, सिटी सर्व्हेमध्ये आपल्या जागेची नोंद न केल्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या अनेक जागा

लोकांनी बळकावल्या आहे व त्याचा भुर्दंड महानगरपालिकेला बसत आहे यावर स्थावर
विभागाने जातीने लक्ष द्यावे.

माजी महापौर, श्री.प्रविणजी दटके यांनी सुचित केले की, नागपूर सुधार प्रन्यासच्या
स्थावर विभागाने त्याच्या मालकीच्या जागेच्या संदर्भात एक चांगली व्यवस्था उभी केली आहे
त्यांनी या कामासाठी कोणती एजन्सी लावली ते तपासुन त्याचा निट अभ्यास करण्यांत यावा
त्यामध्ये एकाच कंपनीला काम न देता झोननिहाय वेगवेगळी एजन्सी नियुक्त करावी त्यामुळे
कामाचा निकाल लवकर लागेल. हुडकेश्वर व नरसाळामध्ये महानगरपालिकेला अनेक मोकळया
जागा मिळाल्या आहे भविष्याच्या दृष्टीकोणातुन त्या अत्यंत महत्वाच्या आहे तेथे महानरपालिकेचे
बोर्ड लावण्यात यावे.

नगररचना विभागातर्फे डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये ज्या जागा महानगरपालिकेकरिता आरक्षित
केल्या होत्या त्या जागेचे आरक्षण महानरगपालिकेच्या नावावर झालेले नाही त्याचे हस्तांतरण
करुन त्याचा प्रस्ताव तयार करण्यात यावा.

मा.सभापती, यांनी सुचित केले की, मे.बत्रा ॲन्ड कंपनीने सेंट्रल गव्हर्नमेंटच्या
मालमत्तेच्या जागेचे ऑडीटचे काम केले आहे त्यातला त्यांचा अनुभव लक्षात घेता
महानगरपालिकेच्या जागेकरीता एजन्सी नियुक्त करण्यामध्ये यांचा सुध्दा विचार करण्यात यावा
त्याचबरोबर महानगरपालिकेचे किती भुखंड आहे जे न्यायलयीन प्रक्रीयेमध्ये प्रलंबित आहे त्यावर
निर्णय झालेला नाही याची सविस्तर माहिती पुढील सभेत देण्यात यावी. सिटी सर्व्हेच्या
अधिका–या समवेत बैठक लावुन महानगरपालिकेचा अभिलेख अद्यावत करण्यात यावा.
महानगरपालिकेचा अभिलेखांचा टेक्नीकल युज करुन संपुर्ण अभिलेखांचे ई फायलिंग करुन
महानगरपालिकेचा अभिलेख प्रोटेक्ट करण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासनाव्दारे प्रयत्न करण्याचे
निर्देश देण्यात आले.

नगररचना विभागातर्फे सांगण्यात आले की, 24 रिझर्वेशन साईडसाठी टि.डी.आर. देण्यात
आले आहे असे एकुण 47 प्रकरणामध्ये टिडी.आर. दिला आहे कंन्झरवन्सी लेंथच्या संदर्भात 4 ते
5 महिन्यामध्ये शासन स्तरावर धोरण तयार करण्यात येईल त्या धोरणानुसार पुढे कारवाई
करण्याचे मा.सभापती यांनी सुचित केले.

सरतेशेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले की, लॅन्ड रेकॉर्ड अद्यावत करणे व त्याचे
ऑडीट करणे भविष्याकरता आवश्यक आहे त्या अनुषंगाने प्रशासनाकडुन तात्काळ उपाययोजना
करण्यात यावी तसेच स्थावर विभागाला ताप्पुरत्या स्वरुपात अभिलेख ठेवण्याकरिता 15
दिवसाच्या आत रॅक उपलब्ध करुन दयाव्यात. आतापर्यंत झालेल्या स्थापत्य प्रकल्प व विशेष
समितीमध्ये जेवढे विषय घेण्यात आले त्या सर्व विषयाचा आढावा 2 महिन्यानंतर घेण्यात येईल
त्या अनुषंगाने सर्व अधिका–यांनी अद्यावत माहितीसह उपस्थित रहावे तसेच अति.उपायुक्त

A

यांना विनंती आहे की स्थावर विभागाला स्वतंत्र धोरण तयार करण्याकरिता स्टाफ उपलब्ध करुन दयावे या संदर्भात पुढाकार घेवुन ही सर्व प्रक्रीया मा.आयुक्तांना अवगत करावी, दर महिन्यामध्ये प्रशासकीय स्तरावर आढावा बैठक घ्यावी यामध्ये अनियमितता आढळल्यास समिती तर्फे कठोर करावाई करण्याचे निर्देश देवुन मा.सभापती यांनी सभेचे समापन केले.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची

**स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची मंगळवार दिनांक 23.01.2018 रोजी दुपारी 1.00 वाजता सिव्हिल कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

**सभेत मा.सभापती श्री.संजय बंगाले, मा.उपसभापती श्री. अभय गोटेकर, मा.सदस्या श्रीमती विद्या कन्हेरे, मा.सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे तसेच विभागाकडून मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, नगर अभियंता, कार्यकारी अभियंता(प्रकल्प), कार्यकारी अभियंता, (पेंच प्रोजेक्ट सेल), कार्यकारी अभियंता(बांधकाम) आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्र. 1:– सिमेंट रोड टप्पा 1, 2 व 3 संदर्भात आढावा घेण्यात आला असता संबंधित अधिकारी यांनी माहिती देतांना सांगितले, टप्पा – 1 मध्ये 30 कामे घेण्यात आली असून 14 कामे पुर्ण झाली आहेत. 4 कामे प्रगतीपथावर आहेत. 7 ठिकाणी कामे करू शकतो. यातील 3 कामे वगळावी लागतील. 30 ही कामांची एकत्रित निविदा करण्यात आली होती. 50 टक्के कामे झालेली आहेत. 26.01.2018 पर्यंतचा कामाचा कालावधी आहे. 26 महिन्यांचा पिरेड दिलेला होता. यामध्ये काही कारणास्तव चार–पाच कामे प्रभावित झाली आहेत.

मा.सभापती यांनी 50 टक्के काम पुर्ण झाल्याचे कारण काय? तसेच काम हळूवार होत असल्याचे कारण काय? अशी विचारणा केली असता आर्थिक बाब आणि दीड कोटीचे काम करेपर्यंत बील मिळत नाही. कंत्राटदाराची देयके थांबल्याने कामे बंद आहेत तसेच काही रस्त्यावर अतिक्रमण आहे त्यामुळे कामे थांबली आहेत. कंत्राटदार फक्त चार रस्त्यांची कामे हाती घेतात असेही सांगण्यात आले. ट्राफिकचा प्रश्न, पोल, केबल शिफटींग, पाईपलाईनचे काम यामुळे कामाला गती येत नाही. आतापर्यंत झालेले काम समाधानकारक आहे काय?म्हणून विचारणा केली असता काम समाधानकारक असल्याचे सांगण्यात आले. घाटरोड रेशिमबाग रस्त्यावर आलेल्या क्रॅक बद्दल अनेक तकारी असल्याचे मा.सभापती यांनी विचारणा केली असता सिमेंट रस्त्याचे हे पहिलेच काम होते. सिमेंट रस्त्यांच्या थिकनेसबाबत जे ट्रिटमेंटमध्ये काम घेतले होते ते फेल्युअर झाले त्यामुळे आता थिकनेस वाढविली आहे. रस्त्यावर क्रॅक कां आले याबाबत प्रायमरी टेस्ट घेतली होती त्यात जे काम करण्यात आले त्याची क्वॉलिटी बरोबर होती. या कामाचे सर्वेक्षण करण्याची जबाबदारी एका संस्थेला देण्यात आली आहे. नेमण्यात आलेल्या संस्थेकडून कामाची पहिली पाहणी झालेली असून त्याचा अहवाल आल्यानंतर निर्णय घेतला जाईल. 14 पैकी फक्त एकच रस्त्यावर हा प्राब्लेम आला आहे असे मुख्य अभियंता श्री. बनगीरवार यांनी माहिती दिली.

मा.उप सभापती श्री.अभय गोटेकर यांनी रस्त्यावर आलेल्या क्रॅकच्या संदर्भात कंत्राटदारावर पेनॉल्टी लावण्यात आली काय? म्हणून विचारणा केली असता संस्थेमार्फत

इन्वेस्टीगेशन चालू असल्याचे सांगण्यात आले. संस्थेचा रिपोर्ट येत नाही तोपर्यंत पेमेंट थांबविण्यात यावे असेही ते म्हणालेत. सुरूवातीला पेमेंट थांबविले आहे टेस्ट रिपोर्ट आल्यानंतर पैसे रिलीज करण्यात आहे असे संबंधितामार्फत सांगण्यात आले.

दुस–या टप्प्यामध्ये 59 कामे घेतलेली आहे. 48 कामे सुरु आहेत. 19 कामे पुर्ण झाली आहेत. एका रस्त्याच्या बांधकामास अडथळा येत असल्याने तो रस्ता रद्द करण्यात आला आणि त्याऐवजी स्थायी समितीद्वारे प्रस्तावित रस्ता निवडण्यात येणार असल्याचे असे नगर अभियंता श्री.तालेवार यांनी माहिती दिली.

तिस–या टप्प्यातील सिमेंट रस्त्याचा कामाची माहिती कार्यकारी अभियंता श्री.कुकरेजा यांनी दिली. यात 41 किलोमीटरचे रस्ते अंतर्भुत आहेत या संबंधीच्या निविदा दोनदा काढण्यात आलेल्या आहेत. काही रस्त्यासाठी शासनाने व नासुप्रने निधी मंजूर केलेला आहे असेही त्यांनी सांगितले.

शेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले, शहरातील पहिल्या टप्प्यातील सिमेंट रोडची कामे 50 टक्केच झालेली आहेत. पहिल्या व दुस–या टप्प्यातील कामे मोठया प्रमाणात अर्धवट आहेत. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होवून वाहतुकीकी कोंडी होत असल्याने नागरिक त्रस्त आहेत. सिमेंट रोडवरील वाहतुकीची समस्या तातडीने सोडवून सिमेंट रस्त्यांच्या कामाला गती देण्याकरिता विभागाने प्रयत्न करावेत. दोन रस्त्यामधील भाग समतल करणे अत्यावश्यक आहे. गाडी त्यावरून गेली असता उसळते तसेच चौकातील जंक्शनचे समतलीकरण 15 दिवसात करावे तसेच रस्त्याच्या कामांमध्ये सुरक्षा रक्षक नसल्याने अपघाताचे प्रमाणे वाढत आहेत. कंत्राटदारानी नियमानुसार त्या ठिकाणी सुरक्षा गार्ड ठेवणे बंधनकारक आहेत. तिस–या टप्प्यातील सिमेंट रस्त्याचा कामाच्या संदर्भात मा.पालकमंत्री यांची बैठक लावण्याच्या अनुषंगाने संबंधितांनी कार्यवाही करावी असे मा.सभापती यांनी सुचित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती**

म.न.पा. ठराव कमाक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30–3 नुसार गठीत स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची सभा बुधवार दिनांक 31.1.2018 रोजी दुपारी 12.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती ,स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेत समितीचे मा. सभापती श्री संजय अनंत बंगाले, मा. उपसभापती श्री अभय गोटेकर, मा. सदस्या श्रीमती सुषमा चौधरी मा. सदस्या श्रीमती पल्लवी श्यामकुळे, मा. सदस्या श्रीमती रश्मि धुर्वे, मा. सदस्य श्री मोहम्मद जमाल तथा हॉटमीक्स प्लॅन्ट , इमारत विभाग, स्मार्ट सिटी, चे अधिकारी तथा रिलायंसचे प्रतिनिधी इत्यादी उपस्थित होते.

सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

विषय पत्रिकेतील विषय क्रमांक 1 वर चर्चा करण्यात आली त्यानुसार नगर रचना विभागात या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या इमारतींच्या मंजूर नकाशाची संख्या व त्यापासुन प्राप्त उत्पन्न या संदर्भात विभागाव्दारे माहिती देण्यात आली की 830 प्रकरणातुन 245 मंजूरी देण्यात आलेली आहे 439 प्रकरणे नामंजूर करण्यात आले आहे 108 व 38 प्रकरणात कार्यवाही सुरु आहे

विषय क्रमांक 2 नुसार 2017-2018 च्या अर्थसंकल्पात विभागाकडून अपेक्षित उत्पनाचा आढावा यावर चर्चा करण्यात आली विभागाव्दारे माहिती देण्यात आली की अर्थसंकल्पात 105 कोटीचे आय अपेक्षीत होती आतापर्यंत 72कोटी 82 लक्ष उत्पन्न झाले आहे 31 मार्च पर्यन्त 90 कोटी अपेक्षीत आहे.

विषय कमांक 3 नुसार या वर्षात किती नकाशे नामंजूर केले त्यांची कारणे? व एकूण संख्या यावर विभागाव्दारे माहिती देण्यात आली की 439 नकाशे नामंजूर करण्यात आले कागदपत्रे व्यवस्थीत नव्हती तथा त्यावर आक्षेप होते. अश्या अनेक कारणाने प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहे. एकदम लहान क्षेत्राची नकाशे मंजूरी करीता सहज उपाय योजना करण्यासंबंधी निर्देशित करण्यात सांगण्यात आले. 200 स्केअर मीटर क्षेत्रफळाच्या च्या मंजूरीच्या संदर्भात आवश्यक नागपूर शहरातील सर्व आर्कीटेक्टची एक सभा या विषयावर आयुक्तांच्या उपस्थितीत बोलाविण्याची कार्यवाही करण्यात यावी असे निर्देशित करण्यात आले. जे प्रकरण नामंजूर आहे ती प्रकरणे कश्या प्रकारे सोडविता येईल या कडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. सरोज असे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 4 नुसार या आर्थीक वर्षात देण्यात येणा–या टीडीआर ची संख्या किती आहे याबाबत फक्त 10 प्रकरणात टिडीआर देण्यात आले आहे असे विभागाव्दारे सांगण्यात आले.

विषय क्रमांक 5 नुसार 5000 स्के.फिट पर्यन्तच्या भुखंडधारकांना दिलेल्या नकाश्याच्या मंजुरीची संख्या 43 असल्याबद्दल माहिती देण्यात आली.

विषय क्रमांक 6 नागरिकांना चांगली पारदर्षक आणि सहज परवानगी सेवा देण्याच्या दृष्टिने उपाययोजना करणे या संदर्भात लवकरच सर्व प्रक्रिया ही ऑन लाईन होत असल्यामुळे यात सर्व अपेक्षांची पुर्ती होईल असे विभागाव्दारे सांगण्यात आले.

विषय क्रमांक 7 नुसार रस्त्याचे खोदकाम करण्याच्या एजंन्सी/ करारनामा/ कामाचा कालावधी रेस्टोरेशन वर्कमधील अटी/ शर्ती इत्यादी विषय च्या संदर्भात विभागाव्दारे विस्तृत माहिती देण्यात आली.यात या संदर्भात अनेक एजंसीने काम यावेळी सुरु असल्याबद्दल माहिती देण्यात आली. मेट्रो, रिलायंस सारख्या मोठी एजंसीला शासनातर्फे मंजुरी प्राप्त आहे त्या संदर्भात कोणतेही अधिकार महानगरपालिकेकडे नाही काही एजंसीना परवानगी दिल्याची नोंद विभागाकडे आला नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे आपल्यातर्फे ते काम इल्लीगल काम सुरु आहे असे समजण्यास काही हरकत नाही अशी माहिती देण्यात आली.झोन कडून परवानगी घण्याची जबाबदारी संस्थेची आहे एम. एस.ई.बी. एमएसईडीसीएल कडून काम संदर्भात कामाचा जास्त त्रास होतो अशी माहिती देण्यात आली. एन.आय.टी. ने परवानगी घेतली आहे ते स्मार्ट सिटी करीता काम करीत आहे. एल.एन.टी. नेही परवानगी घेतली आहे यावेळी एल.एन.टी. ने अनेक जागी फुटपाथवर इन्स्ट्रुमेंट लावले आहे ते चुकीच्या जागी आहे त्या संदर्भात योग्य स्थानावर लावण्याकरीता सांगण्यात यावे रिलायंस चे प्रतिनिधी रौरभ काळे यांना योग्य जागी इन्स्ट्रुमेंट स्थानांतरण करण्याचे निर्देशित करण्यात आले. शारदा चौक, महाकालकर सभागृह, तुकडोजी चौक अनेक उदाहरण देण्यात आले. तसेच जेथे रिस्टोरेशन करण्यात आलेले नाही ते महानगरपालिकेने करुन बिल संबंधीतां कडून घेण्यात येईल. एल.एन.टी. च्या संदर्भात सांगण्यात आले की 790 किलोमिटर ची परवानगी 8 महिन्यापुर्वी मागीतली होती त्यातील 193 परवानगी त्यांना मिळाली आहे 164 चे रिस्टोरेशन त्यांना दिलेले आहे त्यापैकी 7 किलोमिटरचा डाटा त्यांनी दिला होता त्यांची तपासणी करण्यात आलेली आहे ती व्यवस्थीत आढळून आली आहे. जीओ. रिलायंस यांना 105 किलोमिटरची परवानगी देण्यात आली आहे. सर्वांना काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे . कोणतेही काम सुरु असतांना संबंधीत मा. नगरसेवकांना त्याची माहिती देणे आवश्यक आहे. असे निर्देश विभागाला देण्यात आले.

मेट्रो व अन्य डिपार्टमेंट ज्यांचे काम चालु आहे त्यांच्यासह ट्रॅफिक पोलिस ने समन्वय साधून प्रशासनाच्या, नागरिकांच्या समस्या बाबत अवगत करावे. प्रत्येक जागी काम चालु असलेल्या संस्थेचे बोर्ड लावण्यात यावे संबंधीत इंजिनिअर कर्मचारी चे नंबर त्यावर नमुद करुन देण्यात यावे असे निर्देश सभेत देण्यात आले.

काम करतांना सर्वीसेस डॅमेज झाली आहे त्यांना महानगरपालिकेतर्फे दुरुस्त करण्यात आलेली आहे त्याचे भुगतान संबंधीत संस्थेकडून घेण्यात यावे. तसेच होत असलेल्या महानगरपालिकेच्या सुविधांच्या नुकसानाची भरपाई संबंधीत संस्थेकडून करुन घेण्यात यावी अनेक ठिकाणी संस्थेने चेंबर रस्त्यात केलेले आहे. रस्त्यापेक्षा उंच केलेले आहे ते नियमानुसार करुन घेण्यात यावे. अनेक सिव्हर लाईन वरुन गेलेल्या आहे त्यांची नोंद घेवून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. कोणतेही काम रात्री करण्यात येवु नये असेही निर्देश देवुन सभेच्या समापनाची घोषणा करण्यात आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती

**स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची शुक्रवार दिनांक 09.02.2018 रोजी दुपारी 12.00 वाजता सिव्हिल कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.**

**सभेत मा.सभापती श्री.संजय बंगाले, मा.सदस्या श्रीमती पल्लवी शामकुळे, मा.सदस्या श्रीमती विद्या कन्हेरे, मा.सदस्या सुषमा चौधरी तसेच अति. उपायुक्त श्री.मोहिते, सहा. आयुक्त(जाहिरात) इतर सर्व झोनचे सहा.आयुक्त आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला मा.सभापती यांनी विषयपत्रिकेवरील विषयाचा आढावा घेण्यास सुरूवात केली.

1.अर्थसंकल्पात विभागाला दिलेले उत्पन्नाचे लक्ष्य आणि जाहिरात विभागाच्या उत्पन्नाचा आढावा.

सहा.आयुक्त(जाहिरात)श्रीमती काळे यांनी माहिती देतांना सांगितले, जाहिरात परवाना शुल्कातून 10 कोटीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मल्टीप्लेस शो टॅक्समधून मनपाला एकुण 22,93,000रू.चे उद्दिष्ट होते. मल्टीप्लेस शोची 19 संख्या आहे अलंकार टॉकीज आणि पुनम मल्टीप्लेस बंद झाला आहे. मंथली शो टॅक्स 30 रूपये पर शो असतो. या वर्षी शो टॅक्समधून 13,11,270 रू. उत्पन्न प्राप्त झाले आहे. मागच्या वर्षी जवळपास 15 लक्ष रू. होते. लायसन्स फी ही केंद्रीय स्तरावर जाहिरातीच्या माध्यमातून आणि झोन स्तरावर खाजगी मालमत्तेवरील जाहिराती आणि बस शेल्टरमधून येतो. 3,57,71,286 रू. जाहिरात विभागाला केंद्रीय स्तरावरून आणि 4,51,28,340 रू. उत्पन्न आले आहे.

झोन स्तरावरून 34,09784 रू. उत्पन्न विभागाला प्राप्त झाले आहे. खाजगी मालमत्तेवरील जाहिरातीचे होर्डिंगच्या बाबतीतील परवाना आणि अवैध बॅनर होर्डिंग यामधून उत्पन्न होते.

त्यानंतर मा.सभापती यांनी सांगितले कि, बर्डी येथील मनीष मार्केट मुखबधीर शाळेवरती ॲपो कंपनीने जाहिरातीचे होर्डिंग लावलेले आहे. या जाहिरातीबाबत झोन आणि केंद्रीय कार्यालयाला माहिती नव्हती. सप्टेंबर महिन्यात जाहिरात विभागाला या अनुषंगाने एक पत्र दिले. त्याबाबत काय कार्यवाही आली याबाबत विचारणा केली.

सहा.आयुक्त(जाहिरात) श्रीमती काळे यांनी माहिती देतांना सांगितले, बर्डी येथील मनीष मार्केट मुखबधीर शाळेवरती ॲपो आणि विवो कंपनीचे जाहिरातीचे होर्डिंग लागले होते. त्यांच्याकडून 6 लक्ष 72 हजार रक्कमेची पेनॉल्टी घेतली आहे. ॲपो कंपनीने होर्डिंग काढलेले आहे परंतु विवो कंपनीचे होर्डिंग निघालेले नाही त्याकरिता त्यांना परत तितक्याच रक्कमेची डिमांड दिलेली आहे.

तदनंतर मा. सभापती यांनी निर्देशित केले, एखाद्या कंपनीकडून महानगरपालिकेच्या अटीशर्तीचे उल्लंघन करून महानगरपालिकेच्या मालमत्तेचे विद्रुपीकरण केले जात असल्यास त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. अवैधरित्या लागलेल्या जाहिरातीबाबत नगरसेवकांकडून विभागाच्या लक्षात आणून दिल्यानंतरही जाहिरात विभागातर्फे कार्यवाही करण्यात येत नाही. तसेच परवानगी सपल्याचा कालावधी संपल्यानंतर सुध्दा जाहिरातीचे होर्डिंग काढले जात नाही ज्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. अशा कंपनीवर कार्यवाही करण्यात यावी. शहरात अवैधरित्या मोठमोठया मैदानावर प्रदर्शन, होर्डिंग लागत असतात तसेच मोठया प्रमाणात पत्रके चिटकविण्यात येतात. त्याबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक झोन स्तरावर जास्तीत जास्त जाहिरात करण्याकरिता जागा आयडेंटीफाय करण्यात याव्यात. तसेच उत्पन्न वाढविण्याकरिता मोठे स्पॉट शोधण्यात यावेत.

सहा.आयुक्त श्रीमती काळे यांनी सांगितले कि, 550 जागा आयडेंटीफाय केल्या असून त्या रेग्युलाईज करण्यात येतील. फ्लॉय ओवर वर जाहिरातीच्या दृष्टीने स्टेट, हायवे ॲथारिटीची परवानगी घ्यावी लागेल.

मा.सभापती यांनी निर्देशित केले, अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करून त्वरित अंमलबजावणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

2.जाहिरात विभागाच्या विविध योजना/नवीन प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी मागच्या दोन वर्षात किती कंपनीचे जाहिरातीच्या संदर्भात प्रस्ताव आले याबाबत विचारणा केली असता सहा.आयुक्त श्रीमती काळे यांनी माहिती देतांना सांगितले, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने एक वर्षापूर्वी 10 वर्षाकरिता जाहिरात देण्याच्या अनुषंगाने दोन प्रस्ताव महानगरपालिकेकडे आले होते. परंतु 10 वर्षाकरिता देता येत नाही याकरिता जाहिरात पॉलिसीमध्ये सुधारणा करावी लागेल असेही त्यांनी सांगितले.

मा.सभापती यांनी या प्रस्तावावर गंभीरतेने विचार केला पाहिजे असे सुचित केले तसेच बस स्टॅन्ड, रेल्वे आजूबाजूच्या जागेवरती जाहिरात देण्याचा प्रस्ताव दिला आहे त्याचाही विचार केला पाहिजे. याबाबत पंधरा दिवसात अहवाल सादर करण्यात यावा. फ्लॉय ओवर वर जाहिरातीच्या दृष्टीने स्टेट, हायवे ॲथारिटीची परवानगी घेवून तसे प्रस्ताव करता येत असेल तर ताबडतोब केले पाहिजे. झोन आणि केंद्रीय स्तरावर विवो आणि ॲपो कंपनीच्या लागलेल्या जाहिरातीचा पाहणी दौरा करण्यात यावा. विना परवानगीने लागलेल्या जाहिराती आयडेंटीफाय करून त्यांच्यावर पेनॉल्टी, एफआयआरची कार्यवाही करण्यात यावी. अवैधरित्या लावण्यात आलेल्या छोटया छोटया जाहिरातीच्या बाबतीत त्या कंपनीचा शोध घेवून 31 मार्च पर्यंत उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी

मेट्रोला प्रस्ताव पाठविण्यात यावा. आयडेंटीफाय केलेल्या 400 साईडच्या बाबतीत अति.उपायुक्त यांनी माहिती घ्यावी आणि ते प्रस्ताव पुर्णत्वास आणण्यासाठी लक्ष कार्यान्वित करावे. जाहिरात पॉलिसीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने नियम आणि अटीशर्ती तपासून 15 दिवसांत प्रस्ताव सादर करण्यात यावा जेणेकरून सभागृहासमोर सादर करता येईल. 31 मार्च पर्यंत 10 कोटीचे उद्दिष्ट कसे साध्य करण्याकरिता सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात यावे असे सुचित करून मा. सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती**